**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ६.००)**

**बुधवार, दिनांक : ३० ऑक्टोबर, २०२४**

**ठळक बातम्या**

1. **महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी सात हजार ९९५ उमेदवारांचे अर्ज दाखल, आज अर्जांची छाननी.**

2. **महा विकास आघाडीमध्ये कोणतेही वाद नसून मैत्रिपूर्ण लढत होणार नाहीत -काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांचे स्पष्टीकरण.**

3. **आचारसंहिता लागू झाल्यानंतर कालपर्यंत आलेल्या तक्रारींपैकी ९९ टक्क्यापेक्षा जास्त तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली.**

4. **दिवाळी सणानिमित्त होणाऱ्या प्रवाशांची गर्दी लक्षात घेता भारतीय रेल्वेने अडीच हजारापेक्षा जास्त अतिरिक्त रेल्वे गाड्या सोडल्या; मध्य रेल्वेतर्फे सुद्धा पुणे संत्रागाची नागपूर मार्गे दिवाळी विशेष गाडी चालवण्याचा निर्णय.**

######

**उमेदवारी अर्ज**

महाराष्ट्रातल्या २८८ विधानसभा मतदारसंघातल्या, निवडणुकीसाठी, विविध पक्षांच्या आणि अपक्ष अशा, सात हजार ९९५ उमेदवारांनी, दहा हजार ९०५ अर्ज दाखल केले आहेत. या अर्जांची छाननी, आज होणार असून, चार नोव्हेंबरपर्यंत, अर्ज मागे घेता येतील.

काल अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस होता, शेवटच्या दिवशीही, अनेक उमेदवारांनी, शक्तिप्रदर्शन करत, आपापले उमेदवारी अर्ज, दाखल केले. विधानसभेसाठी, वीस नोव्हेंबरला मतदान होणार आहे तर, २३ नोव्हेंबरला, निकाल जाहीर होतील.

**नामाकंन अर्ज / बंडखोरी**

मध्य नागपूर विधानसभा मतदारसंघातून, काँग्रेसचे माजीमंत्री अनिस अहमद यांनी बंडखोरी करत, वंचित बहुजन आघाडीतर्फे, आपला उमेदवारी अर्ज भरण्याची घोषणा केली होती परंतु, काल त्यांना नामाकंन प्रक्रीयेसाठी उशीर झाल्यामुळ, वंचित बहुजन आघाडी तर्फे उमेदवारी अर्ज भरता आला नाही. या विधानसभा मतदारसंघातून, काँग्रेसचे बंटी शेळके आणि भाजपचे प्रवीण दटके यांच्यात लढत होणार आहे.

**अकोला** जिल्ह्यात नाराज झालेल्या अनेक इच्छुक उमेदवारांनी नामांकन अर्ज दाखल केले आहेत. त्यामुळ जिल्ह्यातील राजकारण चांगलंच तापलं आहे. सर्वाधिक बंडखोर हे महायुतीमधले आहेत. तिसऱ्या आघाडीला नाराज इच्छुकांमुळ आता बळ आलं आहे.

भाजपला सोडचिठ्ठी देत, डॉ.अशोक ओळंबे हे, बच्चू कडू यांच्या प्रहार जनशक्ती पक्षाकडून, अकोला पश्चिम मधून, निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. रवी राठी यांनीही, भाजपला रामराम करत, मूर्तीजापूर इथून प्रहार जनशक्ती पक्षातर्फे निवडणूक लढवणार आहेत.

अकोला पश्चिममधून भाजपचे पाच वेळा नगरसेवक राहिलेले इच्छुक उमेदवार हरीश अलीमचंदानी आणि भाजपचे संजय बडोणे हे अपक्ष म्हणून निवडणूक लढवणार असल्यानं भाजपची डोकेदुखी वाढली आहे. महाविकास आघाडीतही कुरबुरी सुरू आहेत. त्यामुळे अनेकांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केले आहेत.

**महाविकास आघाडी पत्रकार परिषद**

महाविकास आघाडीत जागा वाटपावरून, कोणताही वाद राहिला नसून, कोणत्याही मतदार संघात मैत्रिपूर्ण लढत होणार नाही असा ठाम विश्वास, काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी, रमेश चेन्नीथला यांनी, व्यक्त केला आहे. ते आज मुंबईत, वार्ताहर परिषदेत बोलत होते. ज्या मतदारसंघात, मित्रपक्षांनी अर्ज दाखल केले आहेत, ते दोन दिवसात चर्चा करुन, मागे घेतले जातील. समाजवादी पक्षाशी सुद्धा चर्चा सुरु असून, त्यावरही लवकरच निर्णय होईल असं, त्यांनी सांगितलं.

महायुतीत, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या जागांवरही, भाजपानंच उमेदवार दिले असून, या दोन्ही पक्षांना संपवण्याची, ही भाजपाची सुरुवात आहे, अशी टीका त्यांनी केली. महायुती सरकारला, घालवण्याचा निर्धार जनतेनं केला आहे. त्यामुळ आता हे सरकार जाऊन, जनतेच्या आशा-आकांक्षा पूर्ण करणारं, महाविकास आघाडीचं सरकार येईल असा विश्वास, चेन्नीथला यांनी व्यक्त केला.

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष, मल्लिकार्जून खरगे आणि लोकसभेतले विरोधी पक्षनेते, राहुल गांधी येत्या सहा नोव्हेंबरला, महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येत आहेत. सकाळी नागपूर इथं, संविधान सन्मान संमेलन आयोजित केलं असून, सायंकाळी मुंबईत, बी.के.सी.मध्ये महाविकास आघाडीची गॅरंटी जाहीर केली जाणार आहे.

या कार्यक्रमाला ज्येष्ठ नेते शरद पवार आणि माजी मुख्यमंत्री, उद्धव ठाकरे उपस्थित राहणार आहेत अशी माहिती, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी यावेळी दिली.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी गुजरात दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी, दोन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर असून, आज सायंकाळी ते, एकता नगर इथं, २८० कोटी रुपये खर्चाच्या विविध पायाभूत विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी करतील. त्यानंतर ते ‘आरंभ.६’ अंतर्गत, प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांच्या तुकडीला संबोधित करतील.

‘आत्मनिर्भर आणि विकसित भारतासाठी, दिशादर्शक मार्ग’ ही यंदाच्या या कार्यक्रमाची संकल्पना आहे. उद्या, पंतप्रधान राष्ट्रीय एकता दिनानिमित्त आयोजित समारंभात सहभागी होतील आणि स्टॅच्यू ऑफ युनिटी इथं, पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहतील.

**आचारसंहिता तक्रार**

राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी, आचारसंहिता लागू झाल्यानंतर, कालपर्यंत आलेल्या तक्रारींपैकी, ९९ टक्क्यापेक्षा जास्त तक्रारी, निवडणूक आयोगानं निकाली काढल्या आहेत. १५ ते २९ ऑक्टोबरपर्यंत, सी-व्हिजिल ॲपवर, एकूण एक हजार ६४८ तक्रारी प्राप्त झाल्या.

त्यातल्या एक हजार ६४६ तक्रारी, निकाली काढल्याची माहिती, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं, दिली आहे. सी-व्हिजिल ॲपद्वारे, नागरिकांना आचारसंहिता भंगाबाबत, तक्रार करता येते. तक्रार दाखल झाल्यानंतर, संबंधित पथक, चौकशी करुन, योग्य ती कारवाई केली जाते.

**मतदार जनजागृती**

गेल्या लोकसभा निवडणुकीत, **भंडारा** जिल्हयात ६७ पूर्णांक शून्य चार टक्के मतदान झालं. शहरी भागात मतदाना विषयी अनास्था आढळून आल्यानं, जिल्हयात मोठया प्रमाणावर मतदान जागृतीचे कार्यक्रम सुरू आहेत. त्यातच काल  शहरातील मुख्य त्रिमूर्ती चौकात, फ्लॅश मॉबव्दारे मतदान करण्याचा प्रभावी संदेश देण्यात आला. यात महिला समाज शाळेचे विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ.संजय कोलते, मुख्य कार्यकारी अधिकारी, समीर कुर्तकोटी यासह अन्य विभाग प्रमुख उपस्थित होते. या फ्लॅश मॉबनंतर, शिवाजी क्रीडा संकुलमध्ये जिल्हास्तरीय मतदार जागृतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमांत मतदार जागृती सक्रिय सहभागी येणाऱ्या तसंच जिल्हयाच्या मतदानासाठी, ब्रँड अँबेसेडर असणाऱ्या सदिच्छा दूतांचा देखील सत्कार करण्यात आला. यावेळी पोलीस अधीक्षक, नूरूल हसन यांनी समृद्ध लोकशाहीसाठी मतदानाचा हक्क सर्वांनी बजवावा असं आवाहन केलं. **वर्धा** जिल्हयात मतदान जनजागृतीसाठी, विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येत असून, त्या अनुषंगानं जिल्हा परिषद शाळा खर्डीपुरा येथे मतदान जनजागृती साठी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

**एलआयसीच्या कर्मचारी याचिका**

विधानसभा निवडणूक प्रक्रिया राबवण्यासाठी, केल्या जाणाऱ्या कामातून, आपल्याला वगळण्यात यावं अशी, भारतीय जीवन विमा अर्थात एल.आय.सी.च्या कर्मचाऱ्यांनी, केलेली याचिका, मुंबई उच्च न्यायालयानं काल फेटाळून लावली.

एल.आय.सी.मधल्या, ७० ते ८० टक्के कर्मचाऱ्यांना, विधानसभा निवडणुकीची कामं लावण्यात आली आहेत. कर्मचारी निवडणुकीच्या कामात अडकल्यानं, त्याचा दैनंदिन कामकाजावर परिणाम होत असल्याचं सांगत, त्यांना निवडणुकीच्या कामातून मोकळं करावं अशी याचिका, कर्मचाऱ्यांनी दाखल केली होती.

त्यावर काल, सुटीकालीन खंडपीठाकडे, सुनावणी झाली. त्यावेळी, ही याचिका न्यायालयानं, फेटाळून लावली.

## अतिरिक्त रेल्वे फेरी

दिवाळी आणि छट पूजेच्या सणानिमित्त होणारी प्रवाशांची गर्दी लक्षात घेता, भारतीय रेल्वेनं यंदा गेल्या वर्षीच्या तुलनेत जास्त, म्हणजेच अडीच हजारापेक्षा जास्त अतिरिक्त रेल्वे गाड्या सोडल्या आहेत.सणासुदीच्या काळात यंदा विशेष रेल्वे गाड्यांची संख्या वाढवून सात हजार करण्यात आल्याचं रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी नुकतंच जाहीर केलं होतं. गेल्या वर्षी ही संख्या साडेचार हजार इतकी होती.

दरम्यान, मध्य रेल्वेनं प्रवाशांच्या अतिरिक्त गर्दीची सोय करण्यासाठी पुणे-संतरागाछी, नागपूर मार्गे दिवाळी/छठ सुपर-फास्ट विशेष गाडी चालवण्याचा निर्णय घेतला आहे. गाडी क्रमांक, 01427 पुणे-संतरागाछी सुपर-फास्ट विशेष गाडी पुणेहून रात्री आठ वाजून ५० मिनिटांनी आजपासून सुटेल आणि नागपूर येथून सकाळी 11:55 वाजता, 30 आणि 31 ऑक्टोबर 2024 रोजी सुटेल.

तिसऱ्या दिवशी सकाळी 07:30 वाजता सांतरागाछी येथे पोहोचेल.परतीची गाडी क्रमांक 01428 सांतरागाछी-पुणे सुपर-फास्ट विशेष गाडी संतरागाछीहून संध्याकाळी सहा वाजता, एक नोव्हेंबर पासून सुटेल आणि तीन नोव्हेंबर रविवार रोजी सकाळी 11:20 वाजता नागपूर येथे पोहोचेल.

या गाडीला दौंड चॉर्ड लाईन, अहमदनगर, कोपरगाव, मनमाड, जळगाव, भुसावळ, अकोला, बडनेरा, वर्धा, नागपूर, गोंदिया, दुर्ग, रायपूर, बिलासपूर, रायगड, झारसुगुडा, राउरकेला, चक्रधरपूर, टाटानगर आणि खडगपूर हे थांबे असून बुकिंग आजपासून सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रे आणि www.irctc.co.in वेबसाइटवर सुरू झालं आहे.

## पार्सल तपासणी

रेल्वे परिचालनातील सुरक्षितता, सुनिश्चित करण्यासाठी, नागपूर पार्सल कार्यालयात, रेल्वे सुरक्षा दल अर्थात RPF यांच्या समन्वयानं, विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. याचं उद्दिष्ट फटाके आणि इतर प्रतिबंधित वस्तू, ओळखणे होत.

जे रेल्वे पार्सलच्या माध्यमातून, वाहतुकी दरम्यान सुरक्षेस धोका निर्माण करू शकतात. तपासणी पथकानं, पार्सलची बारकाईनं तपासणी केली आणि, सुरक्षा प्रोटोकॉलचं पालन, सुनिश्चित करण्यासाठी, आवश्यक उपाययोजना केल्यात.
यासोबतच, पार्सल एजंट आणि ठेकेदारांना, योग्य सल्ला देण्यात आला आणि फटाके सारख्या धोकादायक सामग्रीच्या वाहतुकीवर असलेल्या, रेल्वेच्या नियमांचं पालन, करण्याचं महत्त्व, समजावून सांगण्यात आलं.

**रक्कम जप्त**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुक-२०२४च्या अनुषंगानं, संशयीतरित्या रोख रक्कमेची वाहतुक करणा-यांना पकडुन, कार्यवाही करण्यासाठी, चंद्रपुर जिल्हयात ठिकठिकाणी, नाकाबंदी करून, भरारी पथक नेमण्यात आलं आहे. त्या मार्फत अवैध रोख रक्कम वाहतुकीवर, लक्ष ठेवलं जात आहे.

काल वरोरा पोलीस स्टेशन हद्दीत, एका संशयीत चारचाकी वाहनांची पोलीस पथक आणि भरारी पथकानं, संयुक्तरित्या तपासणी केली असता, सदर वाहनात मोठया प्रमाणात रोख रक्कम असल्याचं दिसुन आल्यानं, सदर वाहनास, पोलीस स्टेशन वरोरा इथ आणुन, पोलीसांनी वाहन धारकाकडे विचारपुस केली असता, वाहन धारकानं रोख रक्कम एकुण पंचहत्यात्तर लक्ष रुपये वाहतुकी बाबतचे कारण समाधानकारक उत्तर न दिल्यानं, या वाहनातील रोख रक्कमेचा पंचनामा करुन, सदर रोख रक्कम जप्त करत पुढील चौकशी करीता, आयकर विभागाच्या स्वाधीन करण्यात आली आहे.

#####